## महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतांना.....

### विद्यार्थी/आई/वडील/पालकांकरिता विशेष सुचना :-

प्रवेश घेतांना खालील सुचना लक्षात घ्याव्या व नंतरच या महाविद्यालयामध्ये प्रवेश निश्चित करावा.

१) महाविद्यालयामधील नियमित तासिकांना, कार्यक्रमाला तसेच सर्व उपक्रमामध्ये उपस्थिती अनिवार्य राहील.

२) महाविद्यालयाच्या गणवेशामध्ये व आयकार्डसह महाविद्यालयामध्ये प्रवेश करता येईल..

३) महाविद्यालयाच्या/विद्यापीठाच्या कोणत्याही परिक्षेमध्ये गैरमार्गाचा अवलंब करू नये.

४) महाविद्यालयामध्ये घेण्यात येणा-या विविध परिक्षांना उपस्थित राहणे आवश्यक राहील.

५) पालक सभेमध्ये पालकांनी उपस्थित राहून तसेच इतरवेळी आपल्या पाल्याच्या प्रगतीची माहिती जाणून घ्यावी.

६) महाविद्यालयीन तासिका सुरू असतांना विद्यार्थ्यांनी बाहेर फिरू नये.

७) महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतेवेळी व नंतरही कार्यालयाने/प्राध्यापकांनी वेळोवेळी मागितलेली माहिती ताबडतोब द्यावी लागेल.

८) महाविद्यालयामध्ये श्रमदानाला विशेष महत्व दिले असल्यामुळे श्रमदानामध्ये भाग घेणे अनिवार्य राहील.

९) वेळोवेळी होणा-या खेळाच्या, योगाच्या तासिकांना उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१०) महाविद्यालयामध्ये गुटखा, तंबाखू व इतर व्यसनाचा अवलंब करणे कायदेशीर गुन्हा राहील.

११) महाविद्यालयामध्ये होणा-या प्रार्थनेला उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

१२) महाविद्यालयामध्ये कोणत्याही वस्तुची नासधूस करणे गैरकृत्य समजून दंड आकारण्यात येईल.

१३) महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी, व इतरांसोबत संभाषण करतांना योग्य भाषेचा वापर करावा.

१४) भविष्यात यापुढे विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाईन होतील त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ॲनड्रॉईड फोन असणे अनिवार्य आहे व त्याचा नंबर महाविद्यालयाकडे देणे अनिवार्य आहे.

IQAC CO-ORD.
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur

PRINCIPAL
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur

# • प्रवेशासंबंधी नियमावली •

१) विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश घ्यावा

२) १२ वी उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर तसेच खाजगी रित्या भाग-१ किंवा २ नागपूर विद्यापीठाची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर महाविद्यालयात नियमितपणे प्रवेश घ्यावयाचा असल्या प्रवेश अर्जासोबत विद्यापीठ नामांकण अर्ज भरणे आवश्यक आहे.

३) नागपूर विद्यापीठाअंतर्गत अन्य महाविद्यालयातुन उत्तीर्ण किंवा विषयात सुट सवलतीने ATKT नियमानुसार पुढील वर्गात प्रवेश घ्यावयाचा असल्यास स्वत:चा नामांकन क्रमांक प्रवेश अर्जात नमुद करणे आवश्यक आहे.

४) नागपूर विद्यापीठा व्यतिरिक्त अन्य विद्यापीठातुन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास प्रवेश अर्जासोबत नागपूर विद्यापीठ नामांकण अर्ज भरून सादर करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित विद्यापीठाचे मायग्रेशन सर्टीफीकेट प्रवेश पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) जोडणे आवश्यक आहे अन्यथा प्रवेश कायम होणार नाही.

५) आवेदन पत्रासोबत खालील प्रमाणे मुळ प्रमाणपत्रे व प्रत्येकी दोन सत्यप्रतिलिपी अथवा झेरॉक्स प्रती जोडाव्यात महाविद्यालयात मुळ कागदपत्रे सादर केल्यानंतर ती परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

- अ) महाविद्यालय सोडण्याचा दाखला
- ब) पात्रता परिक्षेची गुणपत्रिका
- क) चारीत्र्य प्रमाणपत्र
- ड) जातीचा प्रमाणपत्राची सत्यप्रत (अन.जाती,अनु. जमातीचा,विमुक्त भटक्या जातीजमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी)
- इ) उत्पनाचा दाखला प्रत्र
- फ) आधार कार्ड
- ग) बॅक पासबूक झेरॉक्स पत्र व ई-मेल आय.डी.

प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांनी स्वत:चा हस्ताक्षरात पुर्ण भरावा.

प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जात निवडलेले विषय भरणे आवश्यक आहे सदर विषयात बदल करता येणार नाही.

राखीव जागेवरील प्रवेशा करीता जातीचे प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.

प्रवेशासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत वर नमुद केलेली सर्व कागदपत्रे व आवश्यक शुल्क निर्धारीत कालावधीच्या आत भरावे लागेल अन्यथा त्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचा पाल्यानी प्रवेश अर्जासोबत पी.टी.सी. व एस.पी.सी. सवलतीचा अर्ज जोडणे आवश्यक आहे.

PRINCIPAL
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur

१२) खोटी कागदपत्रे सादर केल्यास विद्यार्थी कायदेशीर कार्यवाहीस स्वत: जबाबदार राहील.

१३) सुचित केलेल्या मुदतीच्या आत प्रवेश न घेतल्यास तो अर्ज रद्द समजण्यात येईल या बाबत वेगळी सुचना देण्यात येणार नाही.

१४) डुप्लीकेट टी.सी. वर प्रवेश मिळणार नाही. शिक्षणात खंड असल्यास गॅप सर्टीफीकेट सादर करणे आवश्यक आहे.

१५) अनुत्तीर्ण (ATKT नसलेल्या) विद्यार्थ्यांला कोणत्याही वर्गात प्रवेश मिळणार नाही.

१६) शारिरीक शिक्षण, क्रीडा व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यासाठी संबंधित विभागामार्फत निर्धारीत केलेले नियम बंधनकारक राहीतील.

१७) पर्यावरण शुल्क फक्त बी.ए./बी.कॉम भाग-२ च्या विद्यार्थ्यांना भरावे लागेल.

१८) विद्यापीठाने प्रवेश शुल्कात बदल अथवा दुरूस्ती केल्यास सूचना फलकावर सूचित करण्यात येईल त्यानुसार फी भरावी लागेल.

## शिष्यवृत्ती व आर्थिक सवलती

### १) भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेकरीता लागणारी कागदपत्रे :

१) भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेकरीता लागणारी कागदपत्रे

अ) गुणपत्रिका झेरॉक्स ( १० वी ते पुढे सर्व ) ब) टी.सी. झेरॉक्स क) जातीचे प्रमाणपत्र

ड) नानक्रिमीलीयर (ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी) इ) उत्पन्न प्रमाणपत्र फ) प्रवेश पावती झेरॉक्स

ग) आधार कार्ड घ) बॅक पासबुक झेरॉक्स झ) रहिवाशी प्रमाणपत्र

ज) राशन कार्ड झेरॉक्स ण) खंड पडल्याचे प्रमाणपत्र

य) बॅकेची आधार लिंकची पावती

**छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती आवेदन प्रत्राला लागणारी आवश्यक कागदपत्रे**

१) गुणपत्रिका झेरॉक्स ( १० वी ते पुढे सर्व ) २) टी.सी. झेरॉक्स

३) उत्पन्न प्रमाणपत्र ४) आधार कार्ड

५) बॅक पासबुक झेरॉक्स ६) रहिवासी प्रमाणपत्र

सुचना :- वरील पैकी कोणत्याही एका योजनेचे आवेदन पत्र भरता येईल शिक्षण शुल्क भरणा-या विद्यार्थ्यांना फी माफीचा सवलतीचा अर्ज भरण्याची गरज नाही

PRINCIPAL
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur